**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 10 वी मासिक बैठक दि.30.10.2017**

**स्थळ :- कोकण भवन, 1ला मजला , सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे श्री. सिध्दराम सालीमठ, उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.30.10.2017 रोजी कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | श्री. सिध्दराम सालीमठ, | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. | उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग. |
| 2 | श्री. विश्वास दि. गुजर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर. | अपर चिटणीस |
| 3 | श्री. दिपक पुजारी | आयुक्त मीरा, भाईंदर महानगरपालिका | उप आयुक्त, मीरा, भाईंदर महानगरपालिका |
| 4 | श्री. जयरामेगोडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | उप वनसंरक्षक |
| 5 | श्री. मिलिंद पंडितराव | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 6 | श्रीमती वंदना सुर्यवंशी | जिल्हाधिकारी ठाणे | निवासी उप जिल्हाधिकारी ठाणे |
| 7 | श्री. सुदाम परदेशी | जिल्हाधिकारी ठाणे | उप विभागीय अधिकारी, ठाणे |
| 8 | श्रीमती कल्पना गोडे | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड | तहसिलदार, उरण (प्रतिनिधी जि. रायगड) |
| 9 | श्री. पी.डी. चव्हाण | जिल्हाधिकारी मुंबई | सहाय्यक अधिक्षक |
| 10 | श्री.एन.एन. कुप्ते | सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल. | सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल. |
| 11 | श्री. डी.पी. भोये | पोलिस अधिक्षक, पालघर | पोलिस अधिक्षक, पालघर |
| 12 | श्री. एन.व्ही. बंडगर | पोलिस अधिक्षक रायगड जि. अलिबाग | पोलिस अधिक्षक रायगड जि. अलिबाग |
| 13 | श्री. संतोष जाधव | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | तहसिलदार वैभववाडी. |
| 14 | श्री. संदिप चव्हाण | विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग | तहसिलदार (महसूल) |
| 15 | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार वसई जि. पालघर | तहसिलदार वसई. |
| 16 | श्रीमती कल्पना जगताप | जिल्हाधिकारी रत्नागिरी | उपविभागीय अधिकारी, चिपळूण. |
| 17 | श्री. कृष्णत काटकर | पोलिस उप अधिक्षक, ठाणे ग्रामीण | पोलिस उप अधिक्षक, ठाणे ग्रामीण |
| 18 | श्री. रविंद्र भोसले | पोलिस आयुक्त, ठाणे शहर. | सहाय्यक पोलिस अधिक्षक, ठाणे शहर |
| 19 | श्रीमती मनिषा कदम | आयुक्त् ठाणे महानगर पालिका | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |
| 20 | श्रीमती विद्या सावंत | आयुक्त् ठाणे महानगर पालिका | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |
| 21 | श्री. संजय दोंदे | आयुक्त मिरा-भाईदर महानगरपालिका. | विभाग प्रमुख अधिक्षक |
| 22 | श्री. अंकुश चव्हाण | आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका | अति. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका |
| 23 | श्री. स्टॅलिन डी. | वनशक्ती | संचालक |
| 24 | श्री. विनोद के. पुंशी | नवी मुंबई एन्वायरमेंट प्रीझरवेशन सोसायटी | संचालक |

**दि.**30/10/2017 मा. आयुक्त, कोकण विभाग यांच्या वतीने उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग यांच्या उपस्थितीत सदर बैठक घेण्यात आली. सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.

| **अ.क्र** | **मुद्दा** | **करावयाची कार्यवाही** | **अंमलबजावणी करणारी यंत्रणा** |
|---|---|---|---|
| 1 | कोकण वेटलँड तक्रार निवारण नवीन वेबसाईडला सुरुवात करणे. | अ) सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांनी समितीसमोर वेटलॅन्ड शी संबंधित तक्रारींची नोंद होण्याकरिता ऐक वेगळी Website (संकेतस्थळ) सुरु करायची आहे. त्या संकेतस्थळाची संपूर्ण माहिती (Domain, Hosting etc.)सदस्य सचिवांनी समितीसमोर सांगितले. त्यानुसार समितीने Website सुरु करण्यासाठी संमती दिली.<br>ब) श्री. स्टेलिन डी :- श्री. स्टेलिन डी यांनी सांगितले की ज्या जमिनीचे उल्लंघन केले जात आहे त्याची माहिती संकेतस्थळावर प्रकाशित करावी जेणेकरुन इतर लोकांना त्या जमिनीविषयीची माहिती कळू शकेल. | संबंधित यंत्रणा |
| 2 | टोल फ्री क्र. 1926 या सेवेचा लाभ घेणे. | अ) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार टोल फ्री सेवा चालू करण्यासंदर्भात 1926 Hello Forest या सेवेचा लाभ घेता यावा यासाठी सदस्य सचिवांनी APCCF (ITP) यांना पत्राद्वारे कळविले. त्यानुसार APCCF (ITP) यांनी टोल फ्री सेवा चालू करण्यास रु.1.2 लाख इतका प्रती महिना खर्च अपेक्षित असून सदर निधी पर्यावरण विभागाकडून उपलब्ध करुन दिला जाऊ शकतो. मा.उच्च न्यायालयाने ही सेवा तात्काळ सुरु ठेवण्याचे आदेश दिले असल्याने सदस्य सचिवांनी Ex. Director, Mangrove Foundation यांनी सदर वर्षात 1926 Hello Forest सेवा चालू करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केल्याची माहिती समितीसमोर दिली आहे.<br>ब) समितीने प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्हयातून 2 Nodal officer (एक महसूल व एक वन विभाग) ची नेमणूक करुन त्या संदर्भात माहिती देण्यास जिल्हा प्रशासनाला सांगितले तसेच संबंधित नोडल ऑफिसर त्यांच्या कार्यक्षेत्रात (Jurisdiction) तक्रार निवारण करेल,त्यासाठी समितीने Nodal office संदर्भात आवश्यक असणारी माहिती ई-मेलद्वारे व पोस्टाद्वारे लवकारात लवकर सदस्य सचिवांना पाठविण्याच्या सूचना दिल्या. | संबंधित यंत्रणा |
| 3 | ब्रीफ डॉक्युमेंट तयार करणे. | अ) सदस्य सचिवांनी, समितीसमोर mrsac.maharashtra.gov.in/wrd हया संकेतस्थळा विषयी माहिती दिली.<br>ब) तसेच मा. उच्च न्यायालयाने दिलेले वेटलॅन्ड सुरक्षतेबाबत दि.4.02.2017 व दि.2.10.2017 चे दिलेले आदेश सदस्य सचिवांनी समितीसमोर सादर केले.<br>क) Brief document तयार करण्यासाठी निधी | संबंधित यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपलब्धतेबाबत चर्चा करण्यात आली. सदस्य सचिवांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडून आलेल्या पत्रानुसार निधी उपलब्ध करण्यासंदर्भात सांगितले. त्यानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निधी पुरवण्यासाठी अध्यक्षांनी अपर मुख्य सचिव(पर्यावरण) यांना पत्र पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. | |
| 1) | मागील इतिवृत्तामधील प्राप्त तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. श्री. अनिकेत स. वाडीवकर (मौजे आगाशी ता. वसई जि. पालघर येथील सर्वे क्र. 233 हिस्सा नं. 1अ क्षेत्र 1.46.1 हे. आर. याबाबतची तक्रार) | तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार MRSAC यांच्याकडून आलेल्या वेटलॅन्ड क्षेत्राने बाधित नाही. परंतु कांदळवन कत्तल झाल्याचे त्यांनी सागितले त्यानुसार अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन येथे श्री.यशवंत जयराम भोईर यांच्यावर गुन्हा दाखल करुन एकूण रक्कम रु.19,16,297/- इतक्या रक्कमेची दंडाम्तक नोटीस निर्गमीत करण्यात आली आहे असे बैठकीत सांगितले. समितीने तहसिलदार वसई यांना त्या जागेवर कांदळवनाची झाडे लावण्याचे आदेश देऊन ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर, तहसिलदार वसई, |
| 2) | श्री.विवेकानंद गुप्ता (मौजे मरोल ता.अंधेरी येथील म.भू.क्र.1651A/1व1652B) | तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी अहवालानुसार मिठी नदीवरील गाळ कांढण्यासाठी मेराठ येथे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे मार्फत काम करण्यात आले आहे. सदर ठिकाणी साफसफाईचे काम करण्यासाठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे विषयांकीत मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम न करता तेवढा भाग मोकळा ठेवण्यात आलेला आहे. या ठिकाणचा गाळ काढून व घनकचऱ्याच्या वाहतूकीठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांचेकडील पत्रान्वये मे.दुधवाला डेव्हलपर्स यांना त्यांचे मालकीचा मिळकतीमधून घनकचऱ्याच्या गाडया येजा करण्यासाठी जागा वापरण्यास परवानगी मागितली आहे. तसेच कांदळवन झाडे आढळून आलेली नसल्याने कांदळवनाची तोड/हानी झालेली नाही अशी माहिती बैठकीत दिली आहे त्यानुसार समितीने ही तक्रार बंद करण्याच्या सुचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व संबंधित यंत्रणा. |
| 3) | श्री. धीरज परब | श्री. धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात आयुक्त मीरा-भाईंदर महानगरपालिका यांनी दिलेल्या दि.9/06/2017 चे दोन अहवाल सादर केले आणि त्या अहवालानुसार त्यांच्या प्रतिनीधिंनी खालीलप्रमाणे माहिती सांगितली आहे.<br>1) मौजे जेसल पार्क घोड बंदर रस्ता विकसीत करणे- मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे आणि सदर रस्त्यामधील सीआरझेड ने बाधित नसलेल्या भागात रस्ता तयार करण्यात आला असून सीआरझेड बाधित क्षेत्रावर समक्ष प्राधिकाऱ्यांची मान्यता प्राप्त झाल्यावर कामे करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी झोपडयांवर कार्यवाही करण्यात आली असून घरगुती रेबीट बाबत सार्वजनिक बांधकाम | उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागामार्फत तेथे रेबीट न टाकण्याबाबत सुचना फलक लावण्यात आले आहे.<br>2) मौजे मीरा-भाईंदर मधील पाणथळ जागा बांधकामांना परवानगी देणे, त्यांना विज पुरवठा देणे, रिलायन्स एजंन्सिवर कार्यवाही करणे:- सदर स्थिती मुद्दयात नमूद केलेल्या झोपडयांचे अतिक्रमण प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत काढून टाकण्यात आले आहे.<br>3) भाईंदर पूर्व मधील जेट्टी व अन्य बांधकामांना परवानगी देणे, नवघर येथे पाणथळ जागेवर भराव टाकणे, कच्चा पक्का बांधकाम करणे व जेसल पार्क चौपाटी:- सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने सीआरझेड प्राधिकरणाच्या मान्यतेने श्री गणेश विसर्जनासाठी धक्क्याची पुर्न:बांधणी करण्यात आलेली आहे. तसेच जेसल पार्क चौपाटी येथे महापालिकेने केलेल्या विकास कामा व्यतिरिक्त कोणतेही अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे दिसून येत नाही.<br>4) सरस्वती नगर, साईबाबा नगर मागील मैदान:- साईबाबा नगर मागील सचिन टेंडूलकर मैंदान हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आले असून विविध विकास कामे ही महापालिकेमार्फत करण्यात येत असून सदर ठिकाणी कांदळवनावर मातीचा भराव टाकल्याचे दिसून येत नाही.<br>5) शिवशक्तीनगर मलनिसारण केंद्रामागील कांदळवन व नवघर पाण्याच्य टाकीमागे बांधकामे :- शिवशक्तीनगर येथे महापालिकेमार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली असून तेथे असलेल्या विश्वकर्मा वाडीचे कंपाऊंड भिंतीचे बांधकाम फार जूने असल्याचे दिसून येते व सदर ठिकाणी सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारचे माती भराव भरतीचे पाणी आडविण्याचे दिसून येत नाही तसेच केंद्रशासनाने JNURM योजनेअंतर्गत महापालिकेच्या विभागामार्फत पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.<br>6) नवघर येथील सर्वे क्र. 209 :- सर्वे क्र. 209 लगत माती भराव करुन पत्र्याच्या सहाय्याने कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणाऱ्यावर महापालिकेमार्फत दि.25/06/2015 रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदरच्या परिसरामध्ये टाकण्यात येणाऱ्या घरगुती रॅबीट बाबत सार्वजनिक बांधकाम विभागास तेथे रॅबिट न टाकण्याबाबत सुचनाफलक लावण्यात आले आहे. | |
| 4) | श्री. कुलदीप चौधरी (मौजे उमळे(नायगाव) सर्वे क्र. 60/1 व 60/2 या तक्रारी संदर्भात) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांनी अहवालानुसार MRSAC यांच्याकडून आलेल्या वेटलॅन्ड क्षेत्राने बाधित आहे व पर्यावरण कायदा 1986 अन्वये माणिकपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून कांदळवनाची | जिल्हाधिकारी पालघर, उपआयुक्त वसई विरार महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लागवडीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत श्री.गोविंद ससाणे व इतर यांच्यावर एकूण रु.12,26,162/-इतक्या रक्कमेची दंडात्मक नोटीस निर्गमीत करण्यात आलेली आहे असे बैठकीमध्ये सांगितले. समितीने तहसिलदार वसई यांना त्या जागेवर कांदळवनाची झाडे लावण्याचे आदेश देऊन ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | |
| 5) | श्री. रोहित जोशी | या तक्रारी संदर्भात डेब्रिज काढण्यासाठी आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे सांगितले होते, त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधीने पुढील बैठकीमध्ये अंतरिम अहवाल सादर करण्याबाबत समितीने सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे. |
| 6) | श्री. हरीश पांडे (मौजे मावे ता. बोरीवली येथील नगर भू. क्र. 97 या तक्रारी बाबत) | या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनीधीने विषयांकीत जागेवर कांदळवन क्षेत्राच्या 50 मी. च्या Buffer Zone मध्ये भरणी केल्याने श्री. अंगद चौरासिया यांचेविरुध्द मालवणी पोलीस ठाणे येथे गन्हा दाखल केला आहे. तसेच सदर जागेवर INS हमला यांनी देखील भरणी करुन खेळाचे मैदान बनविले असून या ठिकाणी आता कोणतीही भरणी करुन नये अथवा कोणतेही विकास कामे करुन नये असे आदेश जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिले आहेत अशी बैठकीमध्ये माहिती दिली. या अहवालानुसार समितीने ही तक्रार बंद करण्याबाबत बैठकीत सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |
| 7) | श्री. फ्रान्सिस डिसोजा (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 09/11/2017 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना उपविभागीय अधिकारी, वसई यांनी नोटीस निर्गमीत केली आहे असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर व तहसिलदार वसई |
| 8) | श्री.अनंत दत्तात्रय पाटील (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि.09/11/2017 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना उपविभागीय अधिकारी, वसई यांनी नोटीस निर्गमीत केली आहे असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर व तहसिलदार वसई |
| 9) | श्री. मॅकेन्झी डाबरे (मौजे भुईगांव ता. वसई सर्वे क्र.220 पै.) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी अहवालानुसार MRSAC यांच्याकडून आलेल्या वेटलँन्ड क्षेत्राने बाधित आहे व पर्यावरण कायदा 1986 अन्वये पोलीस स्टेशन वसई येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून कांदळवनाची लागवडीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत श्री. जगदिश महेर व इतर पदाधिकारी यांच्यावर एकूण रु.12,04,148/- इतक्या रक्कमेची दंडात्मक नोटीस निर्गमीत करण्यात आलेली आहे | जिल्हाधिकारी पालघर व तहसिलदार वसई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असे बैठकीमध्ये सांगितले. समितीने तहसिलदार वसई यांना त्या जागेवर कांदळवनाची झाडे लावण्याचे आदेश देऊन ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | |
| 10) | श्री स्टॅलिन डी. (मौजे आगाशी सर्वे क्र.233/1) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार MRSAC यांच्याकडून आलेल्या वेटलँन्ड क्षेत्राने बाधित नाही. परंतु कांदळवन कत्तल झाल्याचे त्यांनी सागितले त्यामुळे अज्ञात इसमाचे विरुध्द अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून कांदळवन लागवडीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत श्री. यशवंत जयराम भोईर यांच्यावर एकूण रक्कम रु.19,16,297/- इतक्या रक्कमेची दंडाम्तक नोटीस निर्गमीत करण्यात आली आहे असे बैठकीत सांगितले. समितीने तहसिलदार वसई यांना त्या जागेवर कांदळवनाची झाडे लावण्याचे आदेश देऊन ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर व तहसिलदार ,वसई |
| 11) | New Link Road Residence Forum, Dahisar West | समितीने या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना विचारणा केली असता त्यांनी कार्यवाही चालू असल्याचे सांगितले. त्यानुसार समितीने कोणती कार्यवाही चालू आहे या संदर्भात लवकरात लवकर अंतरिम अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| 12) | धीरज परब | आयुक्त मीरा-भाईंदार यांनी बेकायदेशीरपणे होणारे अतिक्रमण हटविणे बाकी असून माहे नोव्हेंबर मध्ये अतिक्रमण हटविण्यास वेळ देण्यास सांगितले होते, त्यानुसार समितीने उपायुक्त मिरा-भाईंदर यांना एक महिन्याची मुदत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले. | आयुक्त,मिरा-भाईंदर महानगरपालिका. |
| 13) | श्री.नंदकुमार पवार (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सद्यस्थितीची पहाणी करुन FIR दाखल केली असून निवासी जिल्हा अधिकारी, ठाणे सांगितले. त्यानुसार समितीने त्यांचा अंतरिम अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त ठाणे महानगरपालिका. |
| 14) | श्री.दिलीप मुकुंद पाटील (मौजे ससुनवघर जि. पालघर) | या तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांनी या बैठकीमध्ये मौजे ससुनवगर येथे सदर प्रकरणी अर्जाचे अवलोकन केले असता अर्जामध्ये सर्वे नंबर चा उल्लेख दिसून येत नसल्याने तक्रारदार यांच्या समवेत मंडळ अधिकारी व तलाठी यांनी दि.28/07/2017 रोजी स्थळपहाणी करण्याकरिता अर्जदार यांना समक्ष हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते, परंतु सदर स्थळपहाणी करीता अर्जदार हे अनुपस्थित असल्याचे तहसिलदार वसई यांनी सांगितले. याबाबत अर्जदार यांना समक्ष तलाठी कार्यालयात हजर राहण्याबाबत यांना पत्राद्वारेही कळविण्यात आले होते, परंतु अर्जदार हे अनुपस्थित | जिल्हाधिकारी पालघर व तहसिलदार वसई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असल्याने कोणत्या जागेवर कांदळवनाची हानी झाल्याचे समजले नसल्याकारणाने ही तक्रार खोटी असल्याचे समितीमध्ये ठरविण्यात आले असून ही तक्रार बंद करण्याबाबत बैठकीत सांगितले. | |
| 15) | श्री. ॲल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज (मौजे बोळींज , स.न. 390 ता. वसई जि.पालघर) | विषयांकीत तक्रारीच्या अनुषंगाने मागील बैठकीत चर्चा करण्यात आलेली होती. सदरचा तक्रार अर्ज हा भात शेतीचे प्लॉट होणारे अतिक्रमण संदर्भातील होता. वेटलँन्ड नियमानुसार वेटलॅन्ड व्याख्या भातशेती क्षेत्राचा समावेश नाही. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्याबाबत विचार करित असताना श्री.स्टॅलिन यांनी सदरचे क्षेत्र भातशेतीचे जरी असले तरी पर्यावरणीयदृष्टया अत्यंत महत्वाचे असून SAC ने निश्चित केलेल्या वेटलँन्डच्या यादीतील आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्याबाबत विनंती केली. समितीने त्यांची विनंती मान्य करुन संबंधित तहसिलदार यांना जागेचे GPS रिडींग घेऊन सदरचे क्षेत्र NWIA या यादितील वेटलॅन्ड मध्ये येते किंवा कसे ? यांची शहानिशा करणेबाबत आदेश दिले. त्यानुसार संबंधित तहसिलदार यांना सभेमध्ये अहवाल सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर, मीठ आयुक्त. |
| 16) | धीरज परब | मा.विभागीय आयुक्त यांनी या तक्रारी संदर्भात 1 महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना आयुक्त मीरा-भाईंदार महानगरपालिका यांना दिल्या आहेत. | मिरा भाईंदर महानगरपालिका. |

सदर सेभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

उप आयुक्त (महसुल)
कोकण विभाग

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.